# प्रेसनोट

जा.क्र.पोउआ/वाहतुक/७९२ /२०१८ पुणे शहर दिनांक २४ /०१/२०१८

पुणे शहरातील दत्तवाडी वाहतुक विभागात पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र पर्यत २२०० मि.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकण्याच्या कामाअंतर्गत निलायम ब्रीज येथे रस्ता क्रॉसिंग करुन पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, सदर भागात वाहतुक कोंडी होवु नये व वाहतुक सुरळित चालण्यासाठी दि.२७/०१/२०१८ ते दि.०२/०२/२०१८ रोजी पर्यत खालील मार्गाने डायव्हर्शन केल्यास वाहतुकीची कोंडी न होता वाहतुक सुरळित व सुरक्षित चालू राहिल.

१. जनता वसाहत व गजाजन महाराज चौकाकडुन निलायम ब्रीज मार्गे ना सी फडके चौकाकडे जाणा-या वाहन चालकांनी गजानन महाराज-शिवदर्शन चौक-मित्रमंडळ चौक-सावरकर चौक या मार्गाचा वापर करावा.

२. ना सी फडके चौकाकडुन निलायम ब्रीज कडे जाणा-या वाहन चालकांनी अ) ना सी फडके चौकातुन सरळ पर्वती ओव्हर ब्रीज खालुन डावीकडे सावरकर चौक-मित्रमंडळ सर्कल-वर्धमान चौक-गजानन महाराज चौक किंवा ब) ना सी फडके चौकातुन सरळ पर्वती ओव्हर ब्रीज खालुन सावरकर चौक-मित्रमंडळ मार्गे-शिवदर्शन चौक-गजानन महाराज चौक या मार्गाचा वापर करावा.

तरी सर्व नागरिकांनी वरील रोडवरील वाहतुक बंद असल्याने पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.